# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी २३ ते २९ नोव्हेंबर २०१५ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

## (५४ वा मानक आठवडा)

''हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे''

### हवामानासंबंधी सल्ला

| दिनांक | नोव्हेंबर मधील पाऊस (मि.मी मधे) | | | | | | | सल्ला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | |
| **महाराष्ट्र** | | | | | | | | |
| नागपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | सध्या पिक बोंड उमलण्याच्या अवस्थेत आहे. तुडतुडे, मावा आणि पांढऱ्या माशीचा प्रार्दुभाव आढळून आला. किटकनाशकांच्या मिश्रणाच्या वापरामुळे काही ठिकाणी पांढरी माशी आणि माव्यांची संख्या वाढलेली आहे. काही शेतांमध्ये अल्टरनेरीया ब्लाईट तसेच पानावरील ठिपक्यांच्या रोगांचा प्रार्दुभाव आढळला आहे. पानावरील ठिपक्यांच्या रोगाचा प्रार्दुभाव फारच मोठया ठिकाणी दिसला. उमललेल्या बोंडांमध्ये कपाशीवरील लाल ढेकुण आढळले. शेतकऱ्यांना लाल्यासंबंधी सतर्कता बाळगण्याचा तसेच आवश्यक व्यवस्थापनाचा सल्ला देण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी लाल्याला संवेदनशील असे संकरीत वाण ओळखावे व पुढल्या वर्षी ते वाण लावण्याचे टाळावे. तिव्र तापमान आणि कोरडा दुष्काळ यामुळे बोंडगळ जास्त प्रमाणात आढळून आली आहे. साफ आणि स्वच्छ पध्दतीने कपाशीची वेचणी केल्यास चांगला बाजारभाव मिळवू शकतो. उशीरा पेरणी केलेल्या वाणांना संरक्षात्मक सिंचणासोबत २ टक्के युरीया किंवा २ टक्के डि.ए.पी. ची फवारणी फुलधारणेच्या अवस्थेमध्ये करावी. हिरवी बोंडे धरण्याच्या अवस्थेमध्ये १ टक्का युरीया आणि १ टक्का मॅग्नेशियम सल्फेट ची फवारणी करणे फायदेशीर ठरेल. सेंद्रिय बोंडअळीच्या देखरेखीसाठी कामगंध (फेरोमोन) सापळयांचा उपयोग करावा. जर एका सापळयामध्ये एका रात्रीत ८ पतंग असे सतत तिन दिवस आढळले तर शिफारशीनुसार व्यवस्थापन करावे. गुजरात राज्या लगतच्या जिल्हयांमध्ये तसेच ज्या शेतांमध्ये मार्च किंवा एप्रिल महिन्यांपर्यंत पिके राहत असल्यास बीजी I, बीजी II आणि गैर बी.टी. वाणांमध्ये सेंद्रिय अळींमुळे नुकसान झालेल्या हिरव्या बोंडांची पाहणी करणे आवश्यक आहे. वेचलेल्या कपाशीची साठवणुक ही योग्य पध्दतीने केली की नाही याची खात्री करूण घ्या. गोणपाटाच्या पिशवीचा |
| वर्धा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| चंद्रपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| यवतमाळ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अमरावती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अकोला | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | |
| बुलढाणा | ० | २२ | ११ | ० | ० | ० | ० | |
| परभणी | ० | १६ | ७ | ० | ० | ० | ० | |
| नांदेड | ० | ८ | ४ | ० | ० | ० | ० | |
| बीड | ३ | १७ | ४ | ० | ० | ० | ० | |
| वाशिम | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| धुळे | ४ | २३ | १३ | ० | ० | ० | ० | |
| जळगांव | ० | २३ | १३ | ० | ० | ० | ० | |
| जालना | ० | २२ | ११ | ० | ० | ० | ० | |
| औरंगाबाद | ६ | १७ | ७ | ५ | ० | ० | ० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | वापर कपाशीच्या साठवणुकीसाठी टाळावा. कपाशीच्या कवडया, अवशेष तसेच रोगरहीत बियाण्यांची साठवणुक करणे टाळावे. कपाशीच्या झाडांचे अवशेष जाळण्यापेक्षा त्याचे कंपोस्ट बनविणे फायदेशीर ठरते. शक्य तेवढया लवकर कपाशीची वेचणी करून घ्यावी. |